**प्रस्तावना :-**

अमरावती जिल्हयाचे भौगोलीक क्षेत्र 12212 चौ.कि.मी. असुन वनक्षेत्र 3575 चौ.की.मी. आहे म्हणजेच जिल्हयाचे वनक्षेत्र एकुण भौगोलीक क्षेत्राच्या 29.27% आहे. मात्र अमरावती जिल्हयातील जास्तीत जास्त वनक्षेत्र हे चिखलदरा व धारणी तालुक्यात सलग असे आहे. ते 73.3% आहे.उर्वरित 12 तालुक्यातील वनक्षेत्र हे विखुरलेले, कमी घनतेचे असुन भौगोलीक क्षेत्राच्या 6.7% ऐवढेच आहे.

**वनविभागाची संरचना :-**

अमरावती जिल्यातील धारणी व चिखलदरा तालुके वगळता इतर 12 तालुक्या करीता उपवनसंरक्षक, अमरावती वन विभाग अमरावती हा प्रादेशिक विभाग असुन मेळघाट करीता (चिखलदरा व धारणी तालुका ) पुर्व मेळघाट वन विभाग स्थित चिखलदरा व पश्चिम मेळघाट वनविभाग स्थित परतवाडा हे 2 प्रादेशिक विभाग आहेत. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकरीता सिपना वन्यजिव विभाग स्थित परतवाडा, गुगामल वन्यजिव विभाग स्थित परतवाडा हे पुर्णपणे व आकोट वन्यजिव विभाग स्थित आकोट यांचे अंशत: कार्य क्षेत्र मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात येते.

**वनविभागाची मुलभुत कार्य :-**

1. वन व वन्यजिव संरक्षण
2. वनसंवर्धन
3. वनविकास

**महाराष्ट्र राज्याचे वनधोरण 2008 :-**

राज्य शासनाने शासन निर्णय क्रमांक टि.आर.एस.-1098/प्रक्र-190/फ-6/मुबई दिनांक 22-09-2008 नुसार महाराष्ट्र राज्याचे वनधोरण 2008 ला तत्व: मान्यता दिलेली आहे.

## महाराष्ट्र राज्याच्या वनधोरणाची प्राथमिक उद्दिष्टे

1.1 परिस्थितीकीय समतोल टिकुन राहण्यास आणि पर्यावरणीय स्थैर्य अबाधित राहण्यास, नैसर्गिक आणि मानव निर्मीत वनांचे पुरेशा शास्त्रशुध्द व्यवस्थापन तंत्राचा वापर करुन त्यांचे संवर्धन आणि शाश्वत विकास घडवुन आणणे.

1.2 सर्व पडीक, निकृष्ट आणि अनुत्पादक जमीनीचे जल व मृद संधारण होण्यासाठी पाणलोट क्षेत्र निहाय पुनर्वनिकरण करणे.

1.3 सामाजिक वानिकी व कृषी वानिकीच्या व्दारे जनतेला व विशेष करुन भुमीहीन व दुर्बल गट तसेच स्त्रियां यांना सहभागी करुन सर्व उपलब्ध सरकारी, सामुहीक व खाजगी जमीनीवरील वनव्याप्ती मोठया प्रमाणात वाढविणे.

1.4 पुर आणि दुष्काळ यावर मात करण्यासाठी तसेच जलाशयाचे गाळ भरण्यापासुन वाचविण्यासाठी जल व मृद संधारण कामाव्दारे नद्या, तलाव आणि जलाशयाच्या पाणलोट क्षेत्राची होणारी जमिनीची धुप थांबवुन असे क्षेत्र पडीक होण्यापासुन वाचविणे

1.5 वनजमीनीची व वनांतील वृक्षांची उत्पादन क्षमता वाढविणे

1.6 ग्रामीण क्षेत्रातील गरीबांची आणि आदिवासींच्या जळावु लाकडाबाबत,चा-याबाबत, अकाष्ट वनोपजाबाबत असलेल्या मुलभुत गरजा भागविणे आणि या वनोपजांच्या मागणी आणि पुरवठयामधिल तुट कमी करणे.

1.7 लाकुड व लाकडाची उत्पादने यांस पर्यायी वस्तुचा वापर जास्तीत जास्त वाढवुन व उपलब्ध वनउपजांच्या योग्य वापराला उत्तेजन देवुन वनांवरील जैविक भार कमी करणे

1.8 दिर्घकालीन योजना व कृती कार्यक्रम बनवुन वन्यजिव व जैविक विविधतेचे संरक्षण व विकास करणे

वनधोरणाला अनुसरुन अमरावती जिल्हयात  वनविभागात वन्यजिव विभागाने 2015 पर्यन्त खालील प्रमाणे उद्दिष्टे निश्चित केलेली आहे.

## I वृक्षाच्छादन वाढविणे :-

राष्ट्रीय वन निती व महाराष्ट्राचे वनधोरणानुसार एकुण भौगोलीक क्षेत्राच्या 33% क्षेत्र हे वृक्षाच्छादनाखाली आणावयाचे आहे. अमरावती जिल्हयात सद्यास्थिती 29.27% वनक्षेत्र आहे. त्यामुळे वनक्षेत्रा बाहेरील अतिरिक्त 4% क्षेत्र वृक्षाच्छादनाखाली आणणे आवश्यक आहे उपलब्ध माहितीनुसार सामाजिक वनिकरण विभागाव्दारे खाजगी जमीनीवर व वनेत्तर शासकिय जमीनीवर करण्यात आलेली वृक्षलागवड व कृषी विभागाव्दारे शेतजमीनीवर करण्यात आलेली फळझाडे लागवड उदा. आंबा,चिकु इत्यादी एकत्रीत केल्यास अमरावती जिल्हयाचे वृक्षाच्छादन हे 33% पेक्षा जास्त होते.

त्यामुळे अमरावती जिल्हयात वनविभागाकडे असलेल्या कमी घनतेच्या व निकृष्ट वनक्षेत्राचा दर्जा वाढविण्या करीता कार्यआयोजनेप्रमाणे वृक्षलागवड करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार खालील प्रमाणे वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

| वनविभाग | वृक्षलागवडीचे उद्दिष्ट | | |
|---|---|---|---|
| | हेक्टर | रोपांची संख्या | आर्थिक उद्दिष्ट |
| 1 | 2 | 3 | 4 |
| अमरावती विभाग | 2500 | 40,00,000 | 15,00,00,000 |
| पुर्व मेळघाट विभाग चिखलदरा | 1250 | 20,00,000 | 7,50,00,000 |
| पश्चिम मेळघाट विभाग परतवाडा | 1250 | 20,00,000 | 7,50,00,000 |
| एकुण | 5000 | 80,00,000 | 30,00,00,000 |

## II निसर्ग पर्यटन :-

निसर्ग पर्यटनाची संकल्पना दिवसें दिवस लोकप्रिय होत असून, देशाच्या विविध भागात ती रुजत आहे. या निसर्ग पर्यटनाचा लाभ सर्व समाजाला, प्रामुख्याने वनात वास्तव्यास असलेल्या स्थानिक जनतेला अधिक व्हावा या दृष्टिने निसर्ग पर्यटनास चालना देण्यात येईल. निसर्ग पर्यटनाव्दारे स्थानिक जनतेला रोजगार उपलब्ध होतो तसेच निसर्ग संवर्धनाविषयी जनमानसात जनजागृति सुध्दा करता येते. यासाठी संरक्षित क्षेत्रात तसेच संरक्षित क्षेत्राबाहेरही निसर्ग पर्यटनास वाव मिळावा या दृष्टिने राज्याच्या निसर्ग पर्यटन धोरणात नमुद केल्यानुसार कामे केली जातील.

**III संयुक्त वनव्यवस्थापन :-**

नैसर्गिक वनांचे, मानव निर्मीत रोपवनांचे संरक्षण तसेच, निकृष्ट पडीक वनजमीनी वर केलेली पुनर्निमीती यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी अवलंविण्यात येणा-या कोणत्याही योजना अथवा कार्यक्रमाची यशस्वीता ही सहभागी वनव्यस्थापन या पायाभूत संकल्पनेतुनच साकार होत असल्याने या सहभागी वन व्यवस्थापन योजनेचा अंगीकार करुन तिची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल. संविधानाच्या 73 व्या धटनादुरुस्तीतील तरतुदीस अनुलक्षुन सहभागी वनव्यवस्थापनेला कायद्याचे अधिदान प्राप्त करुन देण्यात येईल.गांवाच्या बहुस्वरुपी परिसर विकासासाठी संबंधीत इतर विभागाशीही समन्वय साधला जाईल. वन विकास कार्यक्रम हा लोकांचा कार्यक्रम व्हावा यासाठी लोकांना आणि अशासकिय संस्थांना निरंतर स्वरुपात कार्यरत ठेवुन त्यांचा या कामी सक्रीय सहभाग वाढविला जाईल. जन प्रसार माध्यमाव्दारे संयुक्त वनव्यवस्थापन योजने अंतर्गतच्या कार्यक्रमांच्या लाभा विषयी गावक-यांचे जाणीवपुर्वक प्रबोधन करयात येईल. सहभागी वनव्यवस्थापन संबंधात ठरवुन दिलेल्या केंद्र शासनाच्या धोरणात्मक निर्देशानुसार, प्रत्येक वनसंरक्षण समितीच्या सक्रीय सहभागाची तरतुद संबंधीत रोपवनाच्या योजनेतील आराखडयातच अंतर्भुत करण्यात येईल. वनव्यवस्थापन समित्यांकडे वर्ग करण्यात आलेल्या वनक्षेत्राचे व्यवस्थापन करण्यासाठी या सहभागी वनव्यवस्थापन समित्यांना निरंतर स्वरुपात कार्यरत ठेवण्यात येईल. संरक्षित वनक्षेत्रातील किंवा वनेत्तर क्षेत्रातील ग्रामपरिसर विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना परस्पर सहभाग या मुळ संकल्पनेला आधारभूत ठरवुन, त्याव्दारे स्थानिक लोकांचे स्वयंस्फुर्त पाठबळ प्राप्त करण्यात येईल. वनरोपवनांच्या संरक्षणासाठी आणि वनवणवा प्रतिबंधक उपाययोजनेसाठी जो निधी मंजुर केला जाईल असा निधी संबंधित सहभागी वनव्यवस्थापन समितीस देण्यात येईल, तथापी हा निधी समित्यांनी वन संरक्षणासंबंधी केलेल्या सर्व प्रयत्नांच्या मोबदल्यातच देण्यात येईल. सहभागी वन व्यवस्थापन समित्या असलेल्या उपलब्ध संसाधनाचा योग्य वापर करुन समितीचे उत्पन्न वाढीच्या दृष्टिने विविध कामे करण्याचे नियोजन करेल व यातुन प्राप्त होणारा निधी गावाच्या विकासासाठी वापरला जाईल.

जे गांव सहभागी योजने अंतर्गतच्या प्रणालीत समाविष्ट झाले असेंल, अशा गावांतील जनतेस वनउपजांचे वाटप संयुक्त वनव्यवस्थापन समितीने ठरवुन दिलेल्या शर्ती व अटिस अधिन राहुन करण्यात येईल व त्यांस कायदयाचे अधिष्ठान प्राप्त करुन देण्यात येईल. या अंतर्गत प्राप्त होणारे हक्क हे संबंधित लाभधारकाने वनसंरक्षणासाठी विशेषत: वनाचें आगीपासून व चराईपासुन संरक्षण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांच्या आधारावर अवलंबुन राहीतील.

| विभाग | संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांची संख्या |
|---|---|
| 1 | 2 |
| अमरावती वन विभाग अमरावती | 256 |
| पुर्व मेळघाट विभाग चिखलदरा | 74 |
| पश्चिम मेळघाट विभाग परतवाडा | 64 |
| एकुण | 394 |

महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार गठीत करण्यात आलेल्या संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांचे बळकटी करण करुन त्यांना अर्थिक दृष्टया , तांत्रीक दृष्टया सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

## iv अकाष्ट वनोपजांचे समुपयोजन :-

मेळधाट सारख्या वनामध्ये प्रकाष्ट वनोपजांचे भांडार असुन त्याचा शास्त्रीय पध्दतीने निष्कासन व मुल्यवर्धन करुन विक्री केल्यास स्थानिक आदिवासींचा आर्थिक दर्जा उंचावुन त्याचे जिवनमान सुधारण्यास मोठया प्रमाणात मदत होवु शकेल त्याचाच एक भाग म्हणुन पश्चिम मेळघाट वनविभागात रुपये 1.00 कोटीची योजना तयार करुन आदिवासींना बांबु पासुन विविध कलात्मक वस्तु तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात येत असुन ही योजना सद्या सुरु करण्यात आलेली आहे व पुढेही राबविण्यात येणार आहे.

## V मानव- वन्यप्राणी संघर्ष कमी करणे :-

दिवसें दिवस वाढत्या मानवी दबावामुळे वन्यप्राण्यांची आश्रयस्थाने वेगाने संकुचित होत असल्याने मानव - वन्यप्राणी संघर्ष वाढत आहे. शहरीकरण व औद्योगिकरणामुळे मानव हा निसर्गाचा भाग म्हणुन नव्हे तर निसर्गापासुन स्वत:ला वेगळा घटक समजु लागला आहे. त्यामुळे सर्वसाधरणपण् मानवातील सहनशीलता वेगाने कमी होवु लागली आहे. हा संघर्ष कमी करण्या करीता अमरावती जिल्हयात योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

## प्रस्तावित कामाचा तपशिल

| अक्र | कामांचे नांव | संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | माती बंधारे | 9 | 6534500 |
| 2 | सिंमेंट बंधारे | 10 | 3360000 |
| 3 | गवत कुरणांचा विकास | 100 हेक्टर | 183000 |
| 4 | सौर कुंपन | 5 कि.मिटर | 2500000 |
| 5 | जाहिरातीचे फलक | 53 नग | 254900 |
| 6 | मोबाईल व्हॅन | 1 नग | 1070000 |
| 7 | वन्यप्राण्याने मनुष्यावर / पशुवर हल्ला केल्यास देण्यात येणारे सानुग्रह अनुदान तसेच शेत पिकाचे नुकसाना बाबत नुकसान भरपाई | | 1000000 |
| | एकुण | | 14902400 |